## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | ५८,०५६ | • महसूल मंडळे | ३ |
| • गावांची संख्या | ५५ | • जि.प.सर्कल | ४ |
| • ग्रामपंचायती | ५५ | • प्रा.आरोग्य केंद्रे | ४ |
| • नगरपरिषद | ०० | • शाळांची संख्या | ११७ |
| • पोलीस ठाणी | २ | • महाविद्यालये | २ |

## कडेगावचा मोहरम

कडेगावचा मोहरम राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा जगप्रसिद्ध सण आहे. पैगंबरांचे नातू इनाम हुसेन यांच्या बलिदानाचा प्रसंग घडला. त्यांनी बलिदान देवून इस्लाम जिवंत ठेवला म्हणून इस्लामचे अनुयायी शोक दिन पाळतात. कडेगाव येथील मोहरम धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श आहे. गेली दीडशे वर्षांची परंपरा सांभाळली जात आहे. एकूण १४ ताबूत बसविले जातात. त्यातील निम्मे म्हणजे ७ ताबूत हिंदुचे असतात. मोहरमची सुरवात ब्राम्हणांनी केलेली आहे. चौदापैकी सात ताबूत १०० ते १२५ फूट उंचीचे असतात. सर्व मान हिंदू समाजाकडे असतो. मोहरम गीता बरोबर राष्ट्रीय एकात्मतेची गीते ही यावेळी गायली जातात. ताबुतांच्या मिरवणुका काढल्या जातात. कडेगावात त्यादिवशी गगनचुंबी ताबुतांच्या भेटी होतात. ताबूत उभारणीस बांबूचा वापर केला जातो. तर शोभिवंत करण्याचा कागदाचा वापर करतात. ताबूत उभारण्यासाठी संस्थानमधील इमामवाड नावाचा वाडा होता. मशिदीसदृश भव्य इमारत होती. ज्यादिवशी ताबूत विसर्जन केले जाई त्या दिवसापासून पुढील वर्षासाठी ताबूत बांधण्याचे काम सुरू होते. हिंदू-मुस्लीम एकीचे प्रतीक म्हणून याकडे पाहिले जाते.

## आद्य महिला समाजसुधारक रमाबाई रानडे

कडेगाव तालुक्यातील दक्षिण बाजूचे शेवटचे टोक असलेल्या सोनहिरा खोऱ्यात असलेले छोटेसे खेडेगाव देवराष्ट्रे. नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, देशाचे उपपंतप्रधानपद भूषविलेले यशवंतराव चव्हाण, ओसाड माळरानांचे नंदनवनात रुपांतर करणारा किमयागार वृक्षमित्र धो.म. मोहिते ही दोन रत्ने देवराष्ट्रे येथे जन्माला आली. मात्र यांच्याही पूर्वी

Scanned by CamScanner

नियमित स्त्रियांना आधार देण्याचा, स्त्रीशिक्षण व स्त्रियांना मतांचा अधिकार असावा या मतांचा जोरदार पुरस्कार करून महिलांना न्याय मिळवून देणाऱ्या आद्य महिला समाजसुधारक रमाबाई रानडे याही याच मातीतलं आणखी एक रत्न.

देवराष्ट्रे गावचे जहागीरदार माधवराव उर्फ अण्णासाहेब कुर्लेकर यांची सर्वात लहान मुलगी रमाबाई रानडे या होत. रमाबाईंचा जन्म २५ जानेवारी १८६२ मध्ये देवराष्ट्रे या गावी झाला. आद्य समाजसुधारक न्या. महादेव गोविंद रानडे यांचा दुसरा विवाह रमाबाईंशी डिसेंबर १८७३ मध्ये झाला. न्या. रानडे यांनी लेखन वाचन, विविध संस्थांचा कारभार या सर्व व्यापातून आपल्या पत्नीस मराठी व इंग्रजी लिहायला व वाचायला शिकवले व तिचे व्यक्तिमत्व घडविले. पतीच्या निधनानंतरही आपले कार्य पुढे चालू ठेवले. हिंदू लेडिज क्लबची स्थापना केली व संस्थेच्या माध्यमातून संसारी स्त्रिया, प्रौढ कुमारिका यांच्यासाठी शिक्षणवर्ग सुरू केले. १९०४ मध्ये भारत महिला परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. १९०८ मध्ये पुण्यात सेवा सदन संस्थेची स्थापना केली. स्त्री कैद्यांसाठी अतुलनीय कार्य केले. आमच्या आयुष्यातील काही आठवणी हे आत्मचरित्रपर पुस्तक, न्यायमूर्ती रानडे यांची धर्मपर व्याख्याने, मिसलेनियस रायटिंग्ज ॲन्ड स्पीचेस ही रमाबाईंची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

जानेवारी १९१३ मध्ये समाजसेवेबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांना 'कैसर ए हिंद' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. त्यांचे २६ एप्रिल १९२४ निधन झाले.

## महिलांचे कार्य

१) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या मातोश्री विठामाता चव्हाण देवराष्ट्रे गावच्या

२) हणमंत वडिये या गावच्या क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याबरोबर स्वातंत्र्यलढ्यात उतरलेल्या त्यांच्या कन्या क्रांतीवीरांगणा हौसाबाई पाटील

३) वनमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या आदर्श माता बयाबाई कदम सोनसळच्या

४) सौ.विजयमाला कदम – कडेगाव येथे मुलींची औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मातोश्री बयाबाई कदम महाविद्यालय, कन्या प्रशाला, पुणे येथे नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह, महिला इंजिनिअरिंग कॉलेज अशा मुलींच्या शिक्षणासाठी प्राधान्याने सोयी–सुविधा निर्मिती.

* बयाबाई कदम न्यासाच्या मदतीने आदर्श माता पुरस्कार दिला जातो.
* स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी 'मुलगी हवी हो' अभियान
* कृष्णाई महोत्सवाच्या माध्यमातून बचत गटातील महिलांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली.

Scanned by CamScanner

* ग्रामीण भागातील महिलांच्या कलागुणांना 'तीचं व्यासपीठ' च्या माध्यमातून व्यासपीठ मिळाले.

## चौरंगीनाथ

कडेगाव तालुक्यातील सोनसळ गावच्या पश्चिमेस सुमारे दिड कि.मी. अंतरावर सह्याद्रीच्या रांगांचा फाटा असणाऱ्या डोंगरावर चौरंगीनाथाचे मंदीर आहे. नाथ परंपरेचा प्रारंभ आदिनाथ भगवान शंकरापासून झाल्याचे मानले जाते. त्यांनी मच्छिंद्रनाथांना दीक्षा देऊन आपले पट्टशिष्य केल्याचा उल्लेख संत वांड:मयात आढळतो. म्हणूनच त्यांना नाथपंथाचे आद्य मानवगुरू मानले जाते. मच्छिद्रनाथांचा काळ अकराव्या शतकातील मानला जातो.

नाथ परंपरेतील नवनाथ सुप्रसिद्ध असून चौरंगीनाथ त्यापैकी एक आहेत. 'नवनाथ कथासार' या ग्रंथामध्ये ३१ ते ३३ व्या अध्यायात चौरंगीनाथाची कथा वर्णन केलेली आहे. पूर्वी काळी 'कौंडण्यनगर' या राज्यामध्ये 'शशांगर' नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची मंदाकिनी नावाची राणी होती. परंतु पोटी संतान नव्हते. पुत्र प्राप्तीसाठी त्याने कठोर तपश्चर्या केली. शिवशंकर प्रसन्न झाले व त्यांनी राजा शशांगरास अयोनिसंभव असा तेजस्वी पुत्र दिला. तोच हा चौरंगीनाथ

चौरंगीनाथाने ज्या डोंगरावर कठोर तप केले त्या डोंगराला चौरंगीनाथाचा डोंगर असे ओळखले जाऊ लागले. पुढे त्याच ठिकाणी जुन्या हेमाडपंथी पद्धतीचे दगडी बांधकाम असलेले मंदीर बांधले गेले. १९ व्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात सोनसळ येथील कदम-इनामदार घराण्यातील हरजी पाटील हे चौरंगीनाथाचे निस्सीम भक्त होऊन गेले. हे देवस्थान एकूण ७७.०७ हेक्टर इतक्या क्षेत्रात असून वारसदारांच्या ताब्यात आहे.

## साहित्य परंपरा

१) रामापूरचे अक्षरयात्री मराठी साहित्यसंमेलन गेल्या दहा वर्षापासून रामापूर येथे अक्षरयात्री प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येते.
संमेलनाचे वैशिष्ट्य - संमेलनाच्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी स्त्री साहित्यिकांची निवड

२) देवराष्ट्रे येथील व्याख्यानमाला
देवराष्ट्रे येथील यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी व यशवंतराव चव्हाण युवा मंचच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती पुण्यतिथी निमित्त भव्य व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात येते.

Scanned by CamScanner

३) हणमंतवडिये येथील क्रांतीवीर भगवानराव (बाप्पा) पाटील अकादमी तर्फे काही पुरस्कार दिले जातात. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

४) अंधकवी चंद्रकांत देशमुखे यांची कविता महाराष्ट्रातील 'आपलं साहित्यं' संमेलनात गाजली.

५) १९८४ मध्ये द.म.साहित्यसंमेलन झाले. संमेलनाचे अध्यक्ष शिवाजी सावंत होते, ज्येष्ठ साहित्यिक वामन होवाल, कवी पांडुरंग माळी, डॉ. जयसिंगराव पवार, सु.धो.मोहिते, रा.तु.पाटील, विलास पाटील यांनी साहित्य परंपरा जपली आहे.

## सागरेश्वर अभयारण्य देवराष्ट्रे

सागरेश्वर अभयारण्य हे सांगली जिल्ह्याच्या कडेगाव तालुक्यातील एक रम्य, निसर्ग सौंदर्यानं नटलेलं, विविध प्रकारची झाडे, वृक्षवेली, विविध प्राणी-पक्षी यामुळे हे ठिकाण पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे. कडेगाव, वाळवा आणि पलूस तालुक्याच्या सीमा जोडणाऱ्या सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये शेवटचे टोक असलेल्या सागरेश्वरच्या डोंगरमाथ्यावर हे ठिकाण आहे. नवमहाराष्ट्राचे शिल्पकार दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेतून आणि वृक्षमित्र धो.म.मोहिते यांच्या अथक परिश्रमातून डोंगरमाथा आज निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. दरवर्षी हजारो पर्यटक, विद्यार्थी अभ्यासक येथे हजेरी लावताना दिसतात.

अभयारण्याचा कार्यारंभ १९७२ च्या दुष्काळात वृक्षमित्र धो.म.मोहिते यांच्या तब्बल एका तासाच्या अथक प्रयत्नास यश येऊन झाला. १०.८७ चौ.किमी च्या वनक्षेत्रास महाराष्ट्र शासनाने १९८५ ला हे क्षेत्र 'अभयारण्य' म्हणून घोषित केले. भारतातील हे पहिलेच मानवनिर्मित अभयारण्य ठरले. विधायक कार्यकर्ता आणि शासन यंत्रणा यांचा सुरेख संगम म्हणजे सागरेश्वर अभयारण्य होय, असे नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी म्हंटले आहे.

सागरेश्वर अभयारण्यातील वने उष्ण व कोरड्या हवामानातील पानझडी व काटेरी वनस्पतींची आहेत. येथे धावडा, सागवान, हिवर, खैर, निग, वड, चंदन, आपटा, सिताफळ या वृक्षजाती आहेत. तसेच लांडगा, कोल्हा, काळवीट, चितळ, सांबर, साळींदर, ससा, मोर, तरस इ. सुमारे दीड हजारावर प्राणी व पक्ष्यांचे वास्तव्य आहे. घाटमाथ्याजवळील ताकारी योजनेच्या पंपगृहाची पाहणी करुन आल्यास घाटात तिर्थक्षेत्र सागरेश्वराचे मंदीर आहे. या परिसरात एकूण ४७ राऊळे, १०८ लिंगे, १७ ओवऱ्या पाच ऋषीमुनींच्या जिवंत समाध्यांनी पावन झाला आहे. अभयारण्यात असलेला

Scanned by CamScanner

छत्री बंगला, किर्लोस्कर पॉईंट, रणशुळ पॉईंट, महानगुंड, तरसगुहा इ. ठिकाणे बघण्यासारखी आहेत. हे अभयारण्य हरणांसाठी राखीव आहे.

Scanned by CamScanner

## जमीन

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | ५८,०५६ | • डोंगराळ क्षेत्र | ११०२ |
| • लागवडीखालील क्षेत्र | ५०,३३२ | • पडीक क्षेत्र | ६२४ |
| • बागायत क्षेत्र | ५६९९ | • वन क्षेत्र | ३५६० |
| • कोरडवाहू क्षेत्र | ३१६६ | | |

## कारखाने

| | | | |
|---|---|---|---|
| • साखर कारखाने | २ | • दूध प्रकल्प | २ |
| • वस्त्रोद्योग | ३ | • फौंड्री | १० |

## कडेगाव तालुक्यातील क्रांतिकारक

कडेगाव तालुक्यामध्ये अनेक कोहिनूर हिरे होऊन गेले. त्यांनी आपल्या कार्याच्या कर्तृत्वावर महाराष्ट्राच्या इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारताला ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या बलिदानाची आहुती दिली. त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिविरांगणा श्रीमती हौसाबाई पाटील, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी शंकरराव निकम यांच्या पत्नी श्रीमती यशोदाबाई निकम, तुकाराम रावजी मोहिते, महादेव मोहिते, किसन चव्हाण, ताम्रपट विजेते, पांडुरंग तातोबा शिंदे, इत्यादी क्रांतिकारकांचा समावेश आहे.

## वांगीचे ऐतिहासिक महत्त्व

वांगी हे गाव शके १५०४ ते १५९२ च्या दरम्यान बिदर बादशाहीच्या काळात वसले आहे. बिरदचे बादशहा काशीम बेरदशाहीच्या काळात तळबीड गावचे दारोजी मोहिते यांनी देवापूर येथे झालेले युध्द जिंकले. त्यावेळी काशीम बेरदशाही यांनी दारोजी मोहिते यांना 'बाती' हा किताब देऊन ८४ गावांची देशमुखी व पाटीलकी इनाम दिली. यावेळी वांगी हे गाव मुख्य होते.

## कडेगावची संस्कृती

कडेगाव तालुक्याच्या पूर्वेला येरळा नदी तर पश्चिमेला जागृत देवस्थान असणारी डोंगराईदेवी त्याच रांगेत नाथपंथीय चौरंगीनाथ, तर दक्षिणेला देवराष्ट्रेत राज्याचे आराध्य दैवत सागरेश्वर 'ज्याला घडे न काशी. त्याने यावे सागरेश्वराशी' अशी म्हणही परिचित आहे.

Scanned by CamScanner